# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक १६.०९.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) मा. अप्पर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—:—**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण ६४ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे दिनांक १६.०९.२०२६ रोजी, मा. अपर पोलीस आयुक्त कार्यालय (दक्षिण प्रभाग), नागपुर शहर येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. वसंत परेदशी (दक्षिण प्रभाग), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहायक पोलीस आयुक्त (अजनी विभाग), मा. श्री. महेश चव्हाण, सहायक पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) व मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहायक पोलीस आयुक्त (कळमना विभाग) हे उपस्थित होते. तसेच, एकूण १५ पोलीस ठाणे येथील आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील असे एकुण १५ अधिकारी व ३२ अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण ६१८ अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.



**२) मा. अप्पर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–**

दिनांक १६.०९.२०२६ चे १४.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण ३३ अटक आरोपींचे आदान–प्रदान हे मा. अपर पोलीस आयुक्त कार्यालय (उत्तर प्रभाग), नागपुर शहर येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्रीमती विनीता शाहु (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उपायुक्त (परि.क्र.२), मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त (परि.क्र.६), मा. श्री. सुनिलसिंग पवार सहायक पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग), मा. श्री. अंकुश खेडकर सहायक पोलीस आयुक्त (कामठी विभाग) व मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहायक पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) हे उपस्थित होते. तसेच, एकूण १८ पोलीस ठाणे येथील आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील असे एकुण १६ अधिकारी व २८ अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण ४६८ अटक आरोपीतांना आदान–प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.



**३) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :– अवैधरित्या दारु विक्री करणाऱ्या तात्पुरत्या हद्दपार ईसमाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०९.२०२६ रोजी एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे रात्रगस्त करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे मानकापुर हद्यीत लोखंडे ले–आऊट, प्लॉट नं. ९५, गोधनी रेल्वे येथे राहणारा व विनोद थुल नावाचा इसम आपले राहते घरुन चोरट्या मार्गाने दारुविक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे एक इसम मिळून आला. त्यास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव विनोद सुधाकर थुल, वय ५० वर्षे असे सांगितले. त्याचे राहते घराची झडती घेतली असता, घरात देशी दारु भिंगरी च्या ९० मिली च्या १३० नग बॉटल किंमती ५,२००/–रू चा साठा

केलेला मिळून आला. आरोपीस मुद्येमालाबाबत विचारणा केली असता, त्याने तो विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन दारुसाठा व दारुविक्रीचे रोख असा एकूण ७,५५०/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो सराईत दारुविक्री करणारा असल्याने, मा. पोलीस उपआयुक्त, परि. क्र. २ यांनी गणेशोत्सव दरम्यान दिनांक १३.०९.२०२६ ते दिनांक २२.०९.२०२६ रोजीपावेतो एकुण १० दिवसांकरीता तात्पुरते हद्यपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी याने मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. २ यांचे मनाई आदेशाचे उल्लघन करून, कोणतीही परवानगी न घेता राहते घरी मिळुन आला तसेच, समक्ष अवैधरित्या दारुविक्री करतांना मिळून आल्याने त्याचेविरुध्द पोलीस ठाणे मानकापुर येथे कलम २२३ भान्यासं. सहकलम ६५(ई) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करुन, आरोपीस मुद्येमालासह मानकापुर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात, सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. उध्दव पोखरकर, पोहवा. विजय गिरी, राहुल गवई, पोअं. आशिष गायधने, अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षीरसागर व चापोअं. चंद्रकांत यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमना :— गोडावुन मधुन चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी हनिफ हारूण किडीया, वय ६३ वर्षे, रा. प्लॉ. नं. ४०१, मुनलाईट इन्क्लेव्ह, मस्के ले—आऊट, कावरापेठ, शांतीनगर, नागपूर यांचे पोलीस ठाणे कळमना हद्दीत, पावनगांव ते धारगांव रोडवरील, डि.के. फार्मचे बाजुला, कॅपीटल ट्रेडर्स नावाचे सुपारी खरेदी—विक्री व्यवसायाचे गोडावुन आहे. दिनांक १२.०९.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक १४.०९.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे गोडावुनचे शटर उचकावुन, आंत प्रवेश करून, गोडावुनमध्ये ठेवलेली सुपारी ५० किग्रॅ वजनाच्या ९४ बॅग व डिव्हीआर असा एकुण १८,०५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. प्रमोद ढोंबणे ७७२१०७९७४९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न करणाऱ्या महीला आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०९.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी सौ. सुनिता पंकज कुलमेथे, वय ३९ वर्षे, रा. आदीवासी नगर, दिनशॉ फॅक्टरी जवळ, गोरेवाडा रोड, नागपुर ह्या त्यांचे दिर नामे बबलु करण कुलमेथे, वय ४१ वर्षे व ईतर परीवारासह एक्सयुव्ही ३०० कार क्र. एमएच. ३१ जि.ए ०५७४ ने बोरगांव येथुन आले व घरासमोर रस्त्याचे कडेला येवुन थांबले. सर्वजण गाडीमधुन उतरत असतांना गिट्टीखदान चौक कडुन येणाऱ्या पांढऱ्या रंगाचे सेल्टॉस कार क्र. एमएच. ३१ एफ.यु ०२७२ ची चालक महीला नामे श्रीमती दिपाली सुशांत भुयान, वय ३२ वर्षे, रा. मंगलमुर्ती ले—आऊट, खडगांव रोड, वाडी, नागपुर हीने तीचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे कारचे मागे उभे असलेले दिर बबलु व त्यांचा मुलगा प्रियांश बबलु कुलमेथे, वय ०२ वर्षे यांना धडक दिली व कारलासुध्दा धडक दिली. तसेच, थोडे समोर उभे असलेली फिर्यादीचे वस्तीत राहणारी कु. वंशीका पृथ्वीराज कुलमेथे, वय १४ वर्षे हीला सुध्दा धडक देवुन जखमी केले. अपघातामध्ये फिर्यादीचे दिर त्यांचा मुलगा प्रियांश व कु. वंशीका कुलमेथे तिघेही गंभीर जखमी झाले. वाहन चालक महीला खाली उतरली असता ती नशेत असल्याचे दिसले. तसेच, ती ज्या दिशेने आली त्या दिशेने काही लोकांनी येवुन गिट्टीखदान चौकात वरील महीलेने पायदळ जाणारे हरीष रामभाऊ रेवतकर, वय ४६ वर्षे, रा. प्लॉट नं. १७, गायत्री नगर, गोधनी, नागपुर यांनासुध्दा कारने धडक देवुन जखमी केल्याचे सांगीतले. तसेच, होंडा डिलक्स एम.

एच ३१ सि.वाय ९८९०, ऑटो क्र. एम.एच ३१ ई.पी १४८४ आणि पॅशन प्रो क्र. एम.एच ३१ ई.एक्स ४६८० या वाहनांनासुध्दा धडक देवुन, त्या वाहनांचे नुकसान केल असे सांगितले. फिर्यादीचे दिर, त्यांचा मुलगा प्रियांश यांना उपचाराकरीता किंग्स वे हॉस्पिटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे. जखमी कु. वंशीका हीचा उपचार सिनर्जी हॉस्पीटल येथे सुरू आहे.

आरोपी कार चालक महीला हीने रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करून, रस्त्यावरील येणारे—जाणारे यांचे जिवीतास धोका होईल याची जाणीव असतांना सुध्दा, कोणत्यातरी नशेत तीचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रस्त्याने जाणारे ईसमांना धडक देवुन जखमी केले, तसेच वाहनांचे अंदाजे १,००,०००/—रू. चे नुकसान केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. सचिन खुटवड ९०९६९५३२८६ यांनी कारचालक महीला आरोपीविरूध्द कलम ११०, २८१ भा.न्या.सं. सहकलम १८४, १८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे पाचपावली</u> :—** शामलाल रंजीत गोखले, वय ६० वर्षे, रा. पाचपावली, पहीला रेल्वे फाटक, अर्जुन गोखले चे घरी किरायाने, नागपूर हे दिनांक ०१.०३.२०२६ चे २०.०० वा. पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील महादेव मंदीर समोरील नितीन किराणा स्टोअर्स येथुन बेपत्ता झाले. अद्याप घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—५ फुट १ इंच, डोळे—काळे, केस—काळे, पांढरे, अंगात—फुलबाहीचा लाईनिंगचा कत्थ्या रंगाचा फुलशर्ट व कत्थ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला होता. भाषा—मराठी/हिंदी बोलतात. ओळख— हनुवटीवर मोस आहे.



शामलाल

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३००४९९/ २०१४ | कलम ३८०, ३४ भा.दं.वि. | **१)** जय सोमनाथ मौर्या, रा. नाका नं. ४, पेट्रोलपंप मागे, शंकर मंदीर जवळ, कळमना. **२)** जितेंद्र शिवदयाल टेंभरे, रा. प्लॉट नं. १२, नागेश्वर नगर ए, नंदनवन, नागपुर. | २७.०९.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१७५७/२०१४ | कलम ४५४, ३८०, ३४ भा. दं.वि. | **१)** सचिन उर्फ दद्दु सन्नुलाल पारधी, रा. मुल्लाखेडी, मुरादपुरा (म.प्र.) ह.मु.– शितलामाता मंदीर चौक, ताजबाग रोड, शाम नगर मैदान झोपडा, सक्करदरा.<br>**२)** प्रेमलाल इंदरलाल आदीवासी राऊत, रा. मोंडरा भादरा, मुरादपुरा (म.प्र.) ह.मु. – शितलामाता मंदीर चौक, ताजबाग रोड, शाम नगर मैदान झोपडा, सक्करदरा. | २३.०९.२०२६ |

**स्वा/–**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र. अपोमसं(वा)/४५/नियो/३१०५/२०१९ दिनांक २०.१०.२०१९ अन्वये पारीत केलेल्या अधिसुचेनेनुसार रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्युमध्ये दरवर्षी १० टक्के घट करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअर्थी नागपूर शहरातील अपघातांची कारणे पाहता सदरचे अपघात हे निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहने चालविल्यामूळे होत असून, त्यामध्ये निष्पाप लोकांचे नाहक बळी जात आहेत व अनेक लोक गंभीर जखमी होवून, त्यांना कायमचे अपंगत्व येत आहे. त्यामुळे होणारे अपघातांवर आळा घालने अत्यंत आवश्यक असून, त्याकरीता शहरातील सुधारीत सिमेंन्ट रस्ते तसेच, ईन्नर व आऊटर रिंग रोड वरून चालणाऱ्या वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित करणे गरजेचे आहे. करीता खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे.

• यापुर्वी निर्गमीत झालेली अधिसुचना क्र. पोउपआ/वावि/अधि.वेग मर्यादा/१००४/२०१७ दिनांक ०९.०३.२०१७ प्रमाणे ठरविण्यात आलेली खालील वाहनांबाबतची वेग मर्यादा रद्द करण्यात येत असून, शहरातील सध्याची लोकसंख्या, वाहनसंख्या तसेच, रस्ते व वाहतूकीची सद्यस्थिती पाहता वाहनांवर खालील प्रमाणे वेग मर्यादेचे बंधन घालण्यात येत आहे.

| महाराष्ट्र राज्यातील वाहनांसाठी अनिर्वाय करण्यात आलेली वेग मर्यादा कि. मी./प्रतितास | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | वाहनांचा प्रकार | प्रवेश नियंत्रण असलेले द्रुतगती मार्ग | | राष्ट्रीय/राज्य महामार्गावर 4 (2+2) अथवा जास्त मार्गिका असणारे विभाजीत (रस्त्याच्या मध्यभागी विभाजक असलेले मार्ग) | | महानगरपालीका कार्यक्षेत्रामध्ये मधील द्रुतगती मार्ग आणि 6 (3+3) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | राष्ट्रीय/राज्य महा मार्गावर 2 अथवा जास्त मर्गिकेचे विभाजक नसलेले रस्ते व महानगर पालीका कार्यक्षेत्रा-मधील 4 (2+2) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | नगरपालीका क्षेत्रातील रस्ते/इतर रस्ते | |
| | | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग (लागू असल्यास) | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग |
| (1) | (2) | (3) | | (4) | | (5) | | (6) | | (7) | |
| | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह 8 प्रवासी यांचे वाहतूकीसाठी केला जातो. (एम. 1 श्रेणीतील वाहने) | 100 | 60 | 90 | 50 | 80 | 40 | 70 | 40 | 60 | 40 |
| | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह 9 किंवा त्यापेक्षा जास्त प्रवासी यांचे वाहतुकीसबंधी केला जातो. ( एम 2 आणि एम 3 श्रेणीतील वाहने) | 80 | 40 | 80 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 50 | 30 |
| | मोटार वाहने ज्यांचा उपयोग माल/सामान वाहतूकीसाठी केला जातो. (सर्व एन श्रेणीतील वाहने) | 80 | 40 | 80 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 40 | 30 |
| | दुचाकी मोटर वाहने | परवानगी नाही | परवानगी नाही | 70 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 50 | 40 |
| | चारचाकी मोटर रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | 60 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 40 | 30 |
| | तीनचाकी मोटर वाहने / रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | 60 | 40 | 50 | 40 | 50 | 40 | 40 | 30 |

**सदर अधिसुचना दिनांक १७.०९.२०२६ पासून ते दिनांक १६.१०.२०२६ पर्यंत अंमलात राहील.**

सदरहु अधिसूचना एक महिन्याच्या कालावधीसाठी पारीत करण्यात येत असून, त्याबाबत नमूद कालावधीत नागरीकांकडून जर काही हरकती व सुचना प्राप्त झाल्या, तर त्याचा विचार पून्हा अधिसूचना काढताना केला जाईल.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/-**

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर.